प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०४.०८.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १. अयुब हिराजी शेख, वय ३९ वर्षे, पद — पोलीस उपनिरीक्षक पो.स्टे.वलगाव अमरावती शहर रा. <br> २. मकसुद अली, कादर अली रा.सौदागर पुरा वलगाव ता.जि.अमरावती (खाजगी व्यक्ती) <br> ३. श्री.मिलींद दादाराव चौधरी, वय ४० वर्षे, धंदा रा. हर्षराज कॉलनी, कॅनेरा बँक मागे, व्ही.एम.व्ही नवसारी रोड अमरावती (खाजगी व्यक्ती) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०४/०८/२०२२ चे १४/२० ते १५/१० वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ५५,०००/— रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ५५,०००/— रुपये |
| ७ | घटनास्थळ | हेरीटेज किचन हॉटेल जवळ व्हि.एम.व्ही रोड अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक ०३/०८/२०२२ रोजी पोलीस स्टेशन वलगाव येथील पोलीस अधिकारी अयुब शेख व त्यांचे रायटर यांनी त्यांना माझे मित्र मिलींद चौधरी यांचेवर बनावट खत विक्री प्रकरणी दाखल गुन्ह्यामध्ये आरोपी न करण्यासाठी ६०,०००/—रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत सविस्तर तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दि.०३/०८/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान पोलीस उपनिरीक्षक श्री.अयुब शेख यांनी तपाससंदर्भाने बोलणी करुन तसेच मिलींद चौधरी यांना पोलीस स्टेशन ला बोलावून तक्रारदार यांना मिलींद चौधरी यांचे सोबत बोलण्यास सांगुन पोलीस उपनिरीक्षक श्री.अयुब शेख व त्यांचे सोबत असणारे मकसुद व तक्रारदार यांचे मित्र श्री. मिलींद चौधरी यांनी पंचासमक्ष बनावट खत विक्री प्रकरणी दाखल गुन्ह्यामध्ये आरोपी न करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक श्री.अयुब शेख यांचे वतीने तडजोडीअंती ५५,०००/—रुपये ची लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम श्री. मिलींद चौधरी यांचेकडे देण्यास सांगुन लाच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक ०४/०८/२०२२ आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी श्री.मिलींद चौधरी यांनी वलगाव पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक श्री.अयुब शेख व त्यांचे सोबत असणारे मकसुद यांचे करीता पंचासमक्ष ५५,०००/— रुपये लाच रक्कम स्विकारल्याने आरोपी यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती श्री.शिवलाल, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती, पो.नि.सतीश उमरे, पो.नि.योगेशकुमार दंदे, पो.ना.राहूल वंजारी, पो.कॉ.शैलेश कडु, कुणाल काकडे यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचार संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५ मो.नं.७०२०६९३४८१
टोल फ्रि नंबर — १०६४

(सतीश उमरे)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.नं.७०२०६९३४८१